सकाळ

मंगळवार, १ ऑक्टोबर २०१९ ७

### औषधनिर्माता दिन

रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी व रसिकलाल एम. धारिवाल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिट्युकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने औषध निर्माता दिवस उत्साहात साजरा केला. या वेळी मंडळाचे मानद अधिकारी नंदकुमार निकम, प्राचार्य एस. ए. फेगडे, प्राचार्या डॉ. श्वेता घोडे उपस्थित होते. चिंचवड पोलिस चौकीचे पोलिस निरीक्षक अन्सार शेख यांनी मार्गदर्शन केले. मंजुश्री गुंजेगावकर यांनी आभार मानले. तसेच महाविद्यालयात ॲडमॅड स्पर्धा घेतली. या स्पर्धेत ४६ संघांनी सहभाग घेतला. सुचेता खोत यांनी सूत्रसंचालन केले.